♦"लक्षात आलंय ना तुझ्या?" टेबलावरच्या भल्यामोठ्या नकाशावर नजर स्थिर ठेवत मी निरर्थक मान हलवली. खरंतर रस्त्याऐवजी एवढ्या मोठ्या नकाशाची घडी कशी घालायची हाच विचार डोकं कुरतडत होता. शाळेतले भुगोलाचे धडे इथे मदतीला येतील असं दिसत नव्हतं. पुन्हा एकदा तोच प्रश्न कानावर आदळल्यावर, त्यातल्या त्यात सोपा मार्ग शोधण्याचा मी प्रयत्न केला.

♦"जो रस्ता सांगतोयस तो 'हायलाईट' करु या का? म्हणजे मला पटकन सांगता येईल" तो नुसताच हसला. होकार धरुन मी आमचा जाण्यायेण्याचा मार्ग नकाशावर पिवळा करुन टाकला.

"आता कोणता रस्ता आहे यानंतर?" एकदम धांदलच उडाली या प्रश्नानंतर. पुढचा रस्ता सांगण्याआधी आत्ता कुठल्या रस्त्यावर आहोत तेच विसरायला झालं. त्यात हातातला नकाशा प्रत्यक्षात वापरायची वेळ आल्यावर निळ्या पृष्ठभागावरच्या मातकट, हिरव्या, राखाडी रेषा, असंख्य आकडे, बारिक चिन्ह, लहान अक्षरातली माहिती, यात पिवळ्या रंगाने मढवलेला रस्ता कुठे हरवला ते कळेना. महत्प्रयासाने पिवळ्या रेषा दृष्टीस पडल्या पण त्या फारच वेड्यावाकड्या धावत होत्या. आता त्या रेषा जशा वळतील त्याप्रमाणे नकाशाची दिशा बदलावी लागणार. वरखाली, मागची बाजू पुढे करुन, उलट सुलट, घडी घालून, उलगडून असे सगळे प्रकार करुन मोडलेल्या वेळात आम्हाला तो रस्ता केव्हाच मागे पडला. आता एका चुकलेल्या 'एक्झिटमुळे' पुन्हा पुढे जावून मागे यावं लागणार होतं. तुम्ही बायका म्हणजेऽऽ... म्हणत रस्त्याच्या कडेला गाडी घेणं, खसकन नकाशा ओढून दिशा नक्की करणं हे घराघरातून घडणारं नाट्यं चालत्या गाडीत सुरु झालं. सर्वसाधारणपणे अमेरिकेतील भारतीयांच्या पर्यटनाचा शुभारंभ, श्रीगणेशा असाच असतो. बाई निर्धार करुन दिशाज्ञान जोपर्यंत पक्कं करत नाही किंवा नवऱ्याकडे नकाशा सोपवून कायम स्वरुपी ड्रायव्हर बनत नाही तोपर्यंत हे नाट्यं दरवेळेस वेगवेगळे रंग भरतच रहातं. या चारपाच वर्षात मात्र *mapquest.com* ने तमाम स्त्रियांवर मेहेरबानी केली आहे. दोन्हीकडचे पत्ते टाकले की तिथपर्यंत कसं पोचायचं ते व्यवस्थित रस्त्याच्या नावांनिशी, अंतरासकट आपल्यासमोर येतं.

अमेरिकेत बससेवा मर्यादित, विमानसेवा खर्चिक असल्याने स्वतःच्या गाडीने फिरणं हाच मार्ग रुळलेला आहे. कुठेही फिरायचं म्हणजे दिशा दाखविणाऱ्या माणसाला मुळात कोणत्या दिशेला जायचं आहे हे माहित असणं भाग असतं. त्यासाठी AAA (ट्रिपल ए) च्या ऑफिसमोर त्या शहराचे नकाशे, हॉटेल्सची माहिती, आकर्षणं या सर्वांची माहितीपत्रकं घेण्यासाठी प्रवासाला निघाल्यानंतर, आयत्यावेळी गाडी उभी करणं, हा देखील रोड ट्रीपला जोडून येणारा भाग. अअअ म्हणजे अमेरिकन ऑटोमोबाईल असोसिएशन. त्यांची वर्षाची फी भरली की मिळणारं सहकार्य अगदी अप्रतिम. प्रवासाच्या आखणीबरोबरच गाडी संर्दभात वाटेत येणाऱ्या अडचणीतही ट्रिपल ए मदतीला तत्पर असते. बंद पडलेली गाडी एक फोन फिरवला की गॅरेज मध्ये हलविण्याचं काम तत्परतेने यांच्याकडून केलं जातं. त्यांच्याकडून त्या शहरातल्या रस्त्यांचा नकाशा, माहितीपत्रकं घेवून फ्रीवे (आपल्याकडील एक्सप्रेस वे) वर पोचलं की गुळगुळीत रस्त्यावर वेग एवढा वाढतो की पोलिसाचा ससेमिरा टाळणं अशक्यच. 'चा पान्याला' दाद देणारी इथली जमात नसल्याने गुपचुप दंड भरणं हेच हातात उरतं. कोर्टात जावून जजसमोर गुन्हा कबुल करुन दंडाची रक्कम कमी झाली तर नशीब, नाहीतर दंड आणि जोडीला विम्याचा वाढलेला दर पर्यटनातील मजा घालवतो, त्यामुळे पोलिस गाडीचे लाल दिवे आपल्या मागे धावले की डोळ्यासमोर हप्ता, दंड नाचायला लागतो. यातून तीनवेळा गेल्यावर तर घरातल्या सगळ्या वाहनचालकांना वर्षभर तिकिट (दंड) न मिळवण्याच्या कसोटीला उतरावं लागतं, नाहीतर लायसन्सवर गदा ठरलेली. त्यामुळेच एकदा का तिकिट मिळालं की जोडीदारापैंकी जो कुणी गाडीचं सारथ्य करत असेल त्याला पुढच्या प्रवासात गाडी कशी चालवायची आणि, हा भारत नाही याचे धडे विनामूल्य गिरवावे लागतात ते हॉटेलमध्ये पोचेपर्यंत. मग मात्र खुल जा सिमसिम अशी अवस्था होवून जाते. संगणकाद्वारे, फोटो पाहून आधीच आरक्षण केल्याबद्दल आपली आपणच पाठ थोपटतो नाहीतर येतायेता पार पाडलेल्या प्रवेशानंतर तिथे पोचून निवास व्यवस्था लावणं म्हणजे... ! करमणुकीसाठी टी.व्ही., आजूबाजूच्या प्रेक्षणीय स्थळांची माहिती असणारी बुकलेटस्, बसण्यासाठी सोफा, टेबलखुर्ची ए. सी. सगळं पाहून आपल्यातला 'ग्राहकराजा' संतुष्ट होतो. स्वयंपाकघर असलेलं हॉटेल आरक्षण असेल तर 'चलो चाय पीते हैं।' करत निवांत बसायचं नाही तर कॉफीचे घोट घेत आराम करायला कॉफीमेकर सज्ज असतातच. सकाळी हॉटेलच्या लॉबीत मिळणारा 'फुक्कट' नाश्ता म्हणजे आनंदाची परमावधी. 'भरपेट हाणा रे नाश्ता म्हणजे दुपारच्या जेवणाची घाई करायला नको' यामागे दुपारी थोडे डॉलर्स वाचतील हा छुपा संकेत असतोच.

या सगळ्या आपल्याकडील उच्चवर्गीयांना तर येथील मध्यमवर्गीयांनाही परवडणाऱ्या सोयीसुविधांचा उपभोग अगदी मनापासून घेतला जातो, इतका की हॉटेल, मोटेल मधले टॉवेल्स, साबण, शॅम्पू आपल्या घरातही सुरुवातीच्या पर्यटनकाळात दिसायला लागतात, नंतर मात्र इथे रुळल्यावर स्थिरावल्यावर भारताचं प्रतिनिधित्व करणं अंगात येतं आणि हा बालिशपणा सगळी मित्रमंडळी एकत्र जमल्यावर सांगण्याचा एक किस्सा म्हणून उरतो.

रॅफ्टींग, बोटींग, ट्युबिंग, स्कीईंग, कॅम्पिंग ह्या गोष्टी प्रेक्षणीय स्थळं बघण्यासारख्याच भारतीय माणसांच्या अंगात हळूहळू भिनायला लागतात. कोस्ट टू कोस्ट पर्यटन करायचं हे तर कुठेतरी प्रत्येकाच्या मनात दडलेलं असतं. देशाच्या एका टोकापासून दुसरं टोक गाठण्यासाठी पंधरा ते एक महिना रजा घेवून स्वदेश चित्रपटातल्यासारखी 'रिक्रिएशन व्हेइकल' भाड्याने घेवून भटकायचं किंवा अमेरिकेच्या 'ॲम ट्रॅक' या रेल्वेने हा प्रवास करायचा. रेल्वेत आपली गाडी नेण्याची व्यवस्था असल्याने प्रत्येक ठिकाणी उतरुन स्वःतच्या गाडीने फिरणं सहजसाध्य होतं, अन्यथा रेल्वेस्टेशनवरुन पुढच्या प्रवासासाठी नातेवाईक, मित्रपरिवार याच्यांवरच अंवलबून रहावं लागतं इतके टॅक्सीचे दर महाग असतात, पुन्हा त्यांना द्यावी लागणारी टिप वेगळीच.

♦समुद्रकिनारा तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच मोहात टाकणारा. त्यात किनाऱ्यालगत घरच भाड्याने घेता आलं तर? आठवड्यासाठी किंवा अगदी एक दोन दिवसांसाठीही अशी घरं सहज मिळतात. चारपाच कुटुंब एकत्र गेली तर हे भाडं परवडतं. समुद्रातल्या वाळुवर बायकांच्या गप्पांचा अड्डा तर समुद्रात पुरुषमुलांच्या हैदोसाला

♦समुद्रकिनाऱ्यावरच्या त्या घरातच मग क्रुझने जाण्याचे बेत सुरु होतात. मेक्सिको, बहामा, अलास्का ही काही ठिकाणं कुठल्याही भारतीयाच्या तोंडून अगदी सहजपणे ऐकू येतात. भारतात आपल्याला जसं परदेशाचं आकर्षण वाटतं तसंच परदेशात राहून भारत भेटीला येताना वाटेत युरोप, दुबई, थायलँड, हॉंगकॉंग, सिंगापूर पाहिलं जातं. एकवर्ष

♦गाडी, रेल्वे किंवा क्रूझ : वाहन काही का असेना, एक ट्रिप झाली की दुसऱ्या सहलीचे वेध लागतात. मित्रमंडळी एकत्र जमली की पुन्हा नवीन पर्यटन स्थळांचे उल्लेख होतात. पाहण्याच्या ठिकाणांची यादी वाढते. या कंपूत कुणी नवीन आले असतील तर जमलेले तमाम नवरा बायको एकमेकांच्या 'ड्रायव्हिंगचे पाय' हाताला तड लागेपर्यंत ओढतात आणि नवागत भारतातल्या पर्यटनापेक्षा आहे तरी काय वेगळं इथलं फिरणं म्हणून या आनंदयात्रेचा पहिला धडा येणाऱ्या शनिवारीच गिरवायचं निश्चित करुन उठतात.